# मालेगाव महानगलिका मालेगाव

## आरोग्य विभाग NUHM

कार्यालयीन टिप्पणी

दिनांक:- १७/०२/२०२५

---

विषय:-राष्ट्रीय शहरी नागरी आरोग्य अभियान(NUHM) अंतर्गत **PHM,CQAC,Microbilogist, ANM** रिक्त पदांची जाहीरात प्रसिध्द करणे बाबत.

संदर्भ:-१) मंजुर आराखडा सन २०२४-२५

२) मा.आयुक्त तथा अभियान संचालक सो,राष्ट्रीय आरोग्य अभियान,मुंबई यांचेकडील दि.११/०२/२०२५ रोजीचे पत्र.

३)मा.उपसंचालक,आरोग्य सेवा,नाशिक मंडळ,नाशिक यांचेकडील दि.१४/०२/२०२५ रोजीचे बिंदुनामावली पडताळणीचे पत्रान्वंये.

४) मा.उपसंचालक,आरोग्य सेवा,नाशिक मंडळ,नाशिक यांचेकडील दि.१४/०२/२०२५ रोजीचे NUHM रिक्त पदे भरणे कामीचे पत्र.

---

मे.सविनय सादर.

**संदर्भ क्रं.०१ ते ०४ चे अवलोकन होणेस विनंती.**

उपरोक्त संदर्भीय विषयान्वंये राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान कार्यक्रम मालेगाव महानगरपालिका, मालेगाव कार्यक्षेत्रात राबविणेत येत आहे.सदरहु कार्यक्रमान्वंये मामनपासाठी एकुण २१६ पदे मंजुर आहेत. त्यापैकी **PHM-१,CQAC-१,Microbilogist-१, ANM-९** असे एकुण १२ रिक्त पदांची बिंदुनामावली तयार करुन अंतिम तपासणी करणेकामी मा.उपसंचालक,आरोग्य सेवा,परीमंडळ नाशिक,नाशिक यांचेकडे दि.०२/०१/२०२५ रोजी सादर करणेत आलेली होती.

२) संदर्भ क्रं.०२ अन्वये मा.आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, महाराष्ट्र मुंबई यांचेकडील राआसो/ मनुष्यबळकक्ष/ पदभरती/ वेळापत्रक/९१३९०-९१७०१/२०२५ दि.११/०२/२०२५ रोजीचे पत्रान्वंये NUHM अंतर्गत विभागीयस्तरावर, महानगरपालिका, जिल्हास्तरावरील पदे विशेष मोहिम राबवुन रिक्त पदे भरणेबाबत कळविले आहे.

३)संदर्भ क्रं.०३ अन्वंये मा.उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक परीमंडळ नाशिक, नाशिक यांचेकडील दि.१४/०२/२०२५ रोजीचे पत्र याकार्यालयाकडे ई-मेल प्राप्त दि.१७/०२/२०२५ अन्वंये मालेगाव महानगरपालिका, मालेगाव राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानातील **PHM-१,CQAC-१,Microbilogist-१, ANM-९** असे एकुण १२ रिक्त पदांची बिंदुनामावली प्राप्त झालेली आहे.

**रिक्त पदांची बिंदुनामावली खालीलप्रमाणे.**

| अ.क्रं | पदाचे नाव | पद संख्या | पदाचे आरक्षण |
|---|---|---|---|
| 1 | PHM(Public Health Manager) | 1 | OPEN-1 |
| 2 | CQAC(City Quality Coordinator ) | 1 | OPEN-1 |
| 3 | Microbilogist | 1 | OPEN-1 |
| 4 | ANM | 9 | SEBC-1 EWS-1 OPEN-7 |

४) संदर्भ क्रं.०४ अन्वंये मा.उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक परीमंडळ नाशिक यांचेकडील दि.१४/०२/२०२५ रोजीचे पत्र याकार्यालयाकडे प्राप्त दि.१७/०२/२०२५ अन्वंये मालेगाव महानगरपालिका, मालेगाव येथील राष्ट्रीय आरोग्य अभियानामधील रिक्त पदाची भरती करणेकामीचे पत्र प्राप्त झालेले आहे.त्याअनुषंगाने मालेगाव मनपा येथील NUHM रिक्त पदाची तात्काळ भरणेकामी याकार्यालयाने जाहीरात तयार केलेली आहे.

संदर्भ क्रं.१ व ४ अन्वंये मालेगाव महानगरपालिका, मालेगाव कार्यक्षेत्रातील राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानातील **PHM-१,CQAC-१,Microbilogist-१, ANM-९** असे रिक्त १२ पदाची भरती प्रकिया करणेकामी मान्यतेस तथा सोबत जोडलेल्या जाहीरातीवरती स्वाक्षरीस्तव सविनय सादर.

(डॉ.राकेश थेटे)
शहरी कार्यक्रम व्यवस्थापक
निवड समिती सदस्य
राष्ट्रीय आरोग्य अभियान,मालेगाव

(डॉ.जयश्री आहेर)
प्र.आरोग्य अधिकारी तथा
निवड समिती सचिव
मालेगाव महानगरपालिका,मालेगाव

मा.सहा.आयुक्त (प्रशासन)सो.मामनपा

मा. महिला व बालविकास अधिकारी

मा. अति. आयुक्त

मा. आयुक्त सो.

महिला व बालकल्याण विभाग
आवक क्र. 107/2025
दिनांक :- 17/02/2025

अति.आयुक्त कार्यालय
आ.क्र. 230
दिनांक 20/2/25

आयुक्त कार्यालय
आ.क्र. 570
दिनांक. 20/02/2025

मालेगाव महानगरपालिका
आरोग्य विभाग
आवक क्र. 824 /2025
दि. 21/02/2025

tipkiran24

# एकात्मिक आरोग्य व कुंटुब कल्याण सोसायटी,मालेगाव

**आरोग्य अधिकारी कार्यालय**

**(02554) 231805,**

विषय:-मालेगाव महानगरपालिका, मालेगाव कार्यक्षेत्रासाठी राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत **PHM/CQAC/Microbilogist/ANM (महिला)** कंत्राटी पध्दतीने तात्पुरती मानधन तत्तावर भरती बाबत.

• NUHM पदभरती जाहीर सुचना

एकात्मिक आरोग्य व कुटुब कल्याण सोसायटी,मालेगाव महानगरपालिका,मालेगाव कार्यक्षेत्रात राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यक्रम राबविणेकामी NUHM मार्गदर्शनानुसार **PHM/CQAC/Microbilogist/ANM (महिला)** कंत्राटी पध्दतीने पदे भरणेत येणार आहे. त्यासाठी इच्छुक उमेदवारांचे अर्ज दि.25/02/2025 ते दि. 05/03/2025 या कालावधीत सकाळी 10.00 ते सांयकाळी 05.00 वाजेपर्यंत आरोग्य विभाग, जुने सभागृह, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव येथे स्विकारण्यात येतील.

सदर कंत्राटी पदांची सविस्तर माहिती मालेगाव महानगरपालिका,मालेगावच्या http://www.malegaoncorporation.org संकेत स्थळावरती प्रसिध्द करणेत आलेली आहे.

आयुक्त

मालेगाव महानगरपालिका,मालेगाव

---

आ.वि.जा.क्रं /2025 दिनांक:- / /2025

प्रति.

-----------------------------

-----------------------------

-----------------------------

वरीलप्रमाणे जाहीरात आपले स्थानीक वृत्तपत्रात( ) CM किंवा त्यापेक्षा कमी आकारात फक्त एक वेळा प्रसिध्द करुन होणा-या बिलासोबत पाच अंक साहित्य सादर करावे.

# मालेजाव महा-नजरपालिज ा,मालेजाव

## एकात्मिक आरोग्य व कुंटुब कल्याण सोसायटी,मालेगाव

## आरोग्य अधिकारी कार्यालय

(०२५५४) २३१८०५, (Ex.२१६) फॅक्स २३०८१४

----------------------------------------- -----------जाहीर सुचना -----------------------------------------------------

**राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत मालेगाव महानगरपालिका,मालेगाव भरती प्रक्रिया ठोक मानधन पध्दतीने खालील पदांसाठी पात्र उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहे.**

| Sr.No | Name Of Post | No.of Post | Educational Qualification | Age Criteria | Remuneration In per Month |
|---|---|---|---|---|---|
| 1 | PHM (Public Health Manager) | 1 (OPEN) | Any Medical Graduatic(MBBS/BAMS/BHMS/BUMS/BDS) With MPH/MHA/MBA In Health Care | 18 to 38 Years For Open Category.18 To 43 Years for reserved Categories | Rs.35000/- |
| 2 | CQAC (City Quality Coordinator ) | 1 (OPEN) | Any Medical Graduatic(MBBS/BAMS/BHMS/BUMS/BDS) With MPH/MHA/MBA Health Care | 18 to 38 Years For Open Category.18 To 43 Years for reserved Categories | Rs.35000/- |
| 3 | Microbilogist | 1 (OPEN) | MBBS From Institute Recognized By Medical Council of India & MD Microbilogist | 18 to 38 Years For Open Category.18 To 43 Years for reserved Categories | Rs.75000/- |
| 4 | ANM | 9 (SEBC-1 EWS-1 OPEN-7) | ANM (Female) Course With Registration Of Maharashtra Nursing Council | 18 to 38 Years For Open Category.18 To 43 Years for reserved Categories | Rs.18000/- |

अटी व शर्ती:-

1) उपरोक्त पदे ही कंत्राटी अत्यंत तात्परुत्या स्वरुपाची असुन नियुक्ती 11 महिने 29 दिवस कालवधीची म्हणजेच माहे 29 जुन 2025 अखेर राहील. व शासनाने सदर पदे नामंजुर केल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता उमेदवारांची सेवा संपुष्टात येईल.
2) जाहीरातील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाने सेवा नियम लागु नाही तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेते सामवुन घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यांसबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.
3) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया समक्ष असावा तसेच अर्जदारविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.
4) उपरोक्त कंत्राटी पदांकरीता दरमहा एकत्रित मानधन देण्यात येईल.
5) सेवानिवृत्त विशेषतज्ञ/कर्मचारी यांचे निवड झालेस सदर पदांकरीता मानधन राज्य स्तरावरुन प्राप्त विहीत मार्गदर्शक सुचनांनुसार मोजमाप करुन अदा करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
6) जाहीरातील रिक्त पदांच्या संख्येत बदल होऊ शकतो तसेच रिक्त ठिकाणामध्ये बदल होऊ शकतो यबाबतचे सर्व अधिकारी मा.आयुक्त तथा प्रशासक सो मालेगाव महानगरपालिका,मालेगाव यांनी राखुन ठेवले आहेत.
7) अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकास प्राधान्य दिले जाईल.
8) एकापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करावयाचा असल्यास उमेदवारांनी प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र अर्ज सादर करावेत.
9) एकापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करताना अर्जासेबत पदाचा प्राधान्यक्रम मुलाखतीचे पुर्वी कार्यलयास सादर करावा.
10) निवड यादीतील गुणक्रमांकाचे आधारे प्राधान्यक्रमाने पदस्थापना दिली जाईल.त्याबाबत उमेदवारांना कुठल्याहरी दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्दद करण्यात येईल.
11) जाहीरातीच्या दिवशी सदर पदासाठी कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी 38 वर्षे व मागासवर्षे 43 वर्षे राहील.

12) उपरोक्त पदांकरीता निवड प्रक्रिया ही प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार अर्जाची छाननी करुन गुणानुक्रमे यादी तयार करण्यात येऊन त्यामध्ये शैक्षणिक पात्रतेचे 50% गुण उच्च शिक्षितचे 20 व शासकीय/निम शासकीय अनुभवासाठी जास्तीत जास्त 30 असे एकुण 100 गुणांनुसार उमेदवाराची अंतिम निवड करण्यात येईल.

13) शासकीय,निमशासकीय तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असणा-या अनुभवाचाच विचार निवड प्रक्रियेत करण्यात येईल.

14) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत सोईनुसार ठिकाण बदलवुल मिळण्याची मागणी करता येणार नाही.

15) उपरोक्त पदापैकी मायक्रोबॉयालाजीस्ट व ए.एन.एम, ईत्यादी पदाकरीता तत्सम कौन्सीलचे रजीष्ट्रेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकरता राहील.अन्यथा उमेदवारांस मुलाखतीत अपात्र ठरविले जाईल.

16) भरती प्रक्रिया स्थगीत करणे/रदद करणे/पदभरती प्रक्रियेस बदल करण्याचे सर्व अधिकार मा.आयुक्त तथा प्रशासक सो मामनपा यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत.याबाबत कोणालाही दावा करता येणार नाही.

17) उमेदवारांने विहीत नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रांच्या छायाकिंत सत्यप्रतिसह आपले अर्ज राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभाग, जुने आयुक्त कार्यालय, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव येथे दि.25/02/2025 ते दि.5/3/2025 रोजी सांयकाळी 05.00 वाजता शासकीय सुटीचे दिवस वगळुन व्यक्तीश सादर करावेत.

18) खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रु.150/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी रु.100/-चा डिमांड ड्राफ्ट **Intergrated Health & Family Welfare Society Malegaon** या नावे देय असावा.

19)सदरहु भरती प्रक्रियेकरीता अर्ज दि. 5/3 /2025 अखेर राहणार असुन तदनंतर छाननी करुन,हरकती/आक्षेप प्राप्त करुन घेणे व त्या निकाली काढणे आदी रितसर शासनाच्या तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानाकडील प्राप्त मार्गदर्शक सुचनांनुसार भरतीप्रकिया पार पाडुन निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देणे इत्यादी बाबत सविस्तर तपशिल वेळोवेळी http://www.malegaoncorporation.org या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेत येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी सदर विषयी कार्यालयात विचारणा करण्यासाठी येऊ नये.

19) सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई यांचे दि.25/04/2016 चे शासन निर्णय अनुसरुन अर्ज शेवटच्या दिनाकास उमेदवाराचे किमान वय 18 वर्षे व कमाल वय खुल्या प्रवर्गासाठी 38 व मागासवर्गीय करीता 43 राहील, अभियानातील रुग्ण सेवेशी संबंधीत पदासाठी(उदा.परीचारीका, अधिपरीचारीका,इत्यादी) यांची कमान वयोमर्यादा 65 वर्षे वयाच्या 60 किवा त्यापेक्षा अधिक वयाच्या उमेदवार यांनी जिल्हा शल्य चिकीत्सक शारीरीक दुष्टया सक्षम असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

20) सदर पदभरती प्रकियेचे संपुर्ण अधिकार पदे कमी किवा जास्त करणे,भरती प्रक्रिया रद करणे,अटी व शर्ती मध्ये बदल करणे,पदस्थापना ठिकाणमध्ये बदल करणे,निवड प्रक्रिया कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार तसेच इत्यादी प्रकारचे सर्व अधिकारी मा.आयुक्त तथा प्रशासक सो यांनी राखुन ठेवला आहे.

खालीलप्रमाणे आवश्यक असलेल्या मुळ कागदपत्राच्या साक्षांकित केलेल्या प्रती अर्जाच्या नमुन्याला जोडाव्यात.

1)शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका 2)जातीचे प्रमाणपत्र 3)शाळा सोडल्याचा/जन्मतारीख दाखला 4)पासपोर्ट आकाराचे 2 फोटो 5)शासकीय अनुभव असलेले प्रमाणित केलेले अनुभव प्रमाणपत्र 6)लहान कुंटुबाचे प्रमाणपत्र.इत्यादी.

Sd
आयुक्त
अध्यक्ष निवड समिती
मालेगाव महानगरपालिका,मालेगाव

# MALEGAON MUNICIPAL CORPORATION, MALEGAON

**Year 2024-25**

APPLICATION FORM

**Applying Post Name :-**__________________________

| STICK RECENT PHOTO HERE |
|---|

(All fields in the forms are mandatory to be filled an Incomplete form submitted will bereated as rejected)

| | | |
|---|---|---|
| **Name:** | | |
| **Father's/Husband's Name:** | | |
| Date of Birth:<br>DD / MM / YYYY | Blood Group: | Gender:<br><br>Marital status : |
| Age : | Existing NHM Employee (Yes/ No) | Nationality: |
| Original Category : | Applying Category : | Caste Certificate Attached : **Yes/No** |

**Address/Contact Details: (Name of the District and Pin code is compulsory)**

| |
|---|
| Address:<br><br>State<br><br>Pin:<br><br>Contact No: |
| E-Mail Id Correspondence: |

Academic /Professional Educational all summary: (Starting form most recent)

| From (MM/YY) | TO (MM/YY) | Degree/ Diploma | University/ Institute | Specialization/ Subjects | Final Year Total Marks & Obtained Marks | Final Year Percentage ( %) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**Work/Experience Summary :( Starting form current/most recent)**

**Experience :**

| Sr. No | Form (MM/YY) | To (MM/YY | Organization | Designation | Responsibilities (Min.30 & Max.50 Words) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| **Total Experience** (In Years & Months): | | | | Relevant Experience to the post applied (In Years & Months): | |
| **Computer Proficiency:** | | | | | |
| **Demand Draft No.:** **Demand Draft Amount :** | | | **Date:- / /** | **Bank Name :** | |

**Declaration:**

I hereby declare that all statements made in the application are true, Complete and correct to the best of my knowledge and belief. I understand that in the event of any information being found untrue/false/incorrect or I do satisfy the eligibility criteria my candidature will be cancelled, without assigning any reason thereof. I have read the content of the advertisement and agree to abide by the rules, regulations and procedures for appointment to the post applied for.

Name:

Date : **Signature**

Disclaimer:

The applicants are required to submit the full filled application on the day of walk in Interview

**<u>Checklist for documents to be submitted :</u>**

1) Full filled Application form in the prescribed format.
2) Valid Demand Draft as per applying category.
3) For age Proof – School Leaving Certificate/ 10th Passing Certificate / Domicile Certificate
4) Degree certificate - all years Mark sheets.
5) If any Post-graduation degree certificate, valid registration- all years Mark sheets.
6) Valid Permanent Registration, renewal with dates.
7) Experience – Experience certificate as per mention in the form

(OFFICE USE ONLY)

Remark :-____________________________________________________________